# ॥ श्रीपद्मनाभस्तोत्रम् ॥

॥ श्रीगणेशाय नमः॥

महासर्पशय्यां तुरीयां च वृत्तिम् । परब्रह्मपूर्णं गुडाकेशकृष्णम् ॥
गदाशङ्खचक्रप्रभापद्मयुक्तम् । प्रभुं पद्मनाभं नमामि नमामि ॥१॥
सुराणां रमेशं गुणानां गुणेशम् । सपद्मावतिं पद्मजाप्राणमीशम् ॥
स्थितेःकारकं  सर्वभूतात्मतत्त्वम् । ससङ्कर्षणं स्वामिनं तं नमामि ॥२॥
तमोंकारतत्त्वं स्मृतिज्ञानमूर्तिम् । तथा विश्वमार्तण्डसामर्थ्यशक्तिम् ॥
महादेवदेवं कृपासिन्धुरूपम् । धनश्रीधवं वासुदेवं नमामि ॥३॥
सुचण्डार्णवश्चण्डसन्तापग्रस्ताः । चतुर्वेदचौर्यं विषण्णो विधाता ॥
क्षणे तारकोऽभूत्स वैकुण्ठराजा । विसारावतारं नमामि नमामि ॥४॥
सुरारातिकार्यं महामन्थनं तत् । तथा चित्ररत्नानि दिव्यानि तानि ॥
स धन्वन्तरिश्चामृतं कालकूटम् । तमेकं हरेः कूर्मरूपं नमामि ॥५॥
पराभूतशक्रश्च नष्टा धरित्री । क्षणे येन दुष्टो जितश्चापिनष्टः ॥
स वेदान्तज्ञानार्कधारी धराधृक् । वराहं स्वरूपं नमामि नमामि ॥६॥
हिरण्याक्षबन्धुर्महाकालनष्टः । महाकालरूपिन्नृसिंह प्रसीद ॥
सुतस्तस्य राजा च भक्तोत्तमो वै । नृसिंहं सुभद्रं नमामि नमामि ॥७॥
वरं ब्रह्मतत्त्वं धृतं येन देहे । । बलेः शीर्षभागे तथान्यस्तपादः ॥ ॥
यतिर्व्याप्यलोकत्रयं ह्यत्यतिष्ठत् । । प्रभुं वामनं तं नमामि नमामि ॥८॥
सहस्रार्जुनो नाम राजाधिराजा । जितश्चापिनष्टस्तथा घोरयुद्धे ॥
प्रभुं विप्ररूपं तथा भार्गवं तम् । । हरिं जामदग्न्यं नमामि नमामि ॥ ॥९॥
महादेवताऽऽत्मा धनुर्वेदधारी । दशग्रीवनाशी सदाक्षेमकारः ॥
अयोध्याधिपः सूर्यवंशे प्रदीप्तः। । ससीतं तथा रामदेवं नमामि ॥१०॥
प्रसन्नस्तु नारायणो नीलवर्णः । स कंसद्विषः केशवश्चारुदत्तः ॥
प्रियं रुक्मिणीशं च राधाप्रियं तम् । हरेः कृष्णरूपं नमामि नमामि ॥११॥
चिदानन्दरूपं हरिं शम्भुरूपम् । मनुष्याकृतिं केशवं विठ्ठलं तम् ॥
विभुं पाण्डुरङ्गं च मायाधवं तम्  । प्रबुद्धावतारं नमामि नमामि ॥१२॥
महाभीमवीरं हयारूढदेवम् । तथा कल्किरूपं प्रसन्नं गभीरम् ॥
गदा तीक्ष्णखड्गं च शूलश्च हस्ते । हरेः कल्किरूपं नमामि नमामि ॥१३॥
प्रभो शेषराजन्हरे विश्वनाथ । गुरो वासुदेव प्रभो चाब्धिवास ॥
प्रभो शेषशायिन्धरित्रीधर त्वम् । सदा पाहि मां देवदेव प्रसीद ॥१४॥

- डॉ.पुष्कराज उदय वर्तक

डॉ. पुष्कराज उदय वर्तक  cell no.9969020588  pushkarajgem@gmail.com

महासर्पावरील निद्रा तुरीय अवस्थेशी ( समाधीशी ) एकरूप झाली आहे असा जो पूर्णपरब्रह्म आणि निद्राजित कृष्ण आहे; गदा-शंख-चक्र-पद्म-दिव्य तेज यांनी युक्त आहे; त्या प्रभू पद्मनाभाला मी पुनः पुनः नमस्कार करतो. ॥ १ ॥
जो देवांचा देवेश्वर आणि गुणांचा गणेश आहे; पद्मावती आणि लक्ष्मीचा प्राणप्रिय पती आहे ; सर्व प्राणिमात्रांचे आत्मतत्त्व असलेला, ( उत्पत्ती-स्थिती-लय यांतील ) स्थितीकारक आहे; त्या शेषनागाच्या स्वामी असलेल्या देवाचे मी नमस्कार करतो. ॥ २ ॥
जो ॐकारतत्त्व आहे, मूर्तिमंत स्मरणशक्ती आणि ज्ञान आहे; ब्रह्मांडातील सर्व सूर्यांचे सामर्थ्य असलेली शक्ती आहे; जो कृपानिधान, लक्ष्मीपती, सर्वव्यापी परमात्मा असा महादेवाचा देव आहे ; त्याला मी नमस्कार करतो. ॥ ३ ॥
( प्रलयातील ) खवळलेल्या सागरात उष्णतेच्या तापाने त्रासलेले (सर्व प्राणिमात्र ) आणि चारही वेद चोरीला गेल्याने दुःखी झालेला ब्रह्मदेव यांच्यासाठी वैकुंठाचा राजा क्षणात तारणहार झाला ; त्या मत्स्य अवताराला पुनः पुनः नमस्कार करतो. ॥ ४ ॥
ते देव-दानवांसाठी कार्य ठरलेले महामंथन; ती वेगवेगळी आणि दिव्य रत्ने; धन्वंतरी, अमृत आणि हलाहल ( ज्याच्यामुळे संस्मरणीय ठरले ); त्या कूर्म अवताराला मी नमस्कार करतो. ॥ ५ ॥
( हिरण्याक्ष नावाच्या राक्षसाकडून ) इंद्र पराभूत झाला आणि पृथ्वी हरवली ( त्याने चोरुन नेली ). त्या दुष्ट राक्षसाला ज्याने क्षणांत मारले; जो पृथ्वी आणि वेदांताचा ज्ञानरूपी सूर्य धारण केलेला असा आहे ; त्या वाराह अवताराला मी नमस्कार करतो. ॥ ६ ॥
हिरण्याक्षाचा बंधू ( हिरण्यकश्यपू ) ज्या महाकाळाने ग्रासला; प्रह्लाद राजा (ज्या ) तुझा श्रेष्ठ भक्त आहे; त्या हे मृत्युप्रभो नृसिंहा ! प्रसन्न हो. त्या शुभ अवतार असलेल्या नृसिंहाला मी नमस्कार करतो. ॥ ७ ॥
ज्याने ब्रह्मण्यतत्त्व शरीरी धारण केले आहे; जो ( एका पायाने पृथ्वी व्यापून दुसरा पाय ) बलीच्या डोक्यावर पाय ठेवून उभा राहिला; जो यति तीनही लोक व्यापून शिल्लक राहिला; त्या वामन प्रभूला मी नमस्कार करतो. ॥ ८ ॥
सहस्रार्जुन नावाच्या राजाधिराजाला ज्याने युद्धात जिंकले आणि वध केला ; त्या ब्राह्मणदेव, जामदग्न्य प्रभू परशुरामाला मी पुनः पुनः नमस्कार करतो.॥ ९ ॥
जो महादेवतेचा ( शंकराचा ) आत्मा आहे, धनुर्वेद धारण करणारा आहे; रावणाचा नाश करणारा आणि सदा कल्याण करणारा आहे; जो अयोध्येचा राजा सूर्यवंशात प्रदीप्त झाला; त्या सीतापती रामदेवाला मी नमस्कार करतो. ॥ १० ॥
जो नीलवर्ण, नारायण, प्रसन्न, चारुदत्त, कंसद्वेषी केशव आहे; त्या हृदयस्थ राधाप्रिय आणि रुक्मिणीचा प्राणप्रिय पती कृष्ण अवताराचे मी पुनः पुनः नमस्कार करतो.॥ ११ ॥
जो शिवस्वरूप झालेला चिदानन्दरूप हरी आहे; त्या मनुष्याकृती, केशव, विठ्ठल, मायापती, सर्वव्यापी, पांडुरंग अशा प्रबुद्ध अवताराला पुनः पुनः नमस्कार करतो. ॥ १२ ॥
घोड्यावर आरुढ झालेला, महाभयंकर वीर तसेच प्रसन्न आणि खोल असे कल्किरूप; ज्याच्या हातात गदा, धारदार तलवार आणि त्रिशूल आहे; त्या कल्किरूपाला मी पुनः पुनः नमस्कार करतो. ॥ १३ ॥
हे नागांच्या अधिपती विश्वनाथ प्रभो ! हे क्षीरसागरवासी वासुदेव प्रभो ! हे शेषावर प्रसन्नपणे शयन करणारा अशा पृथ्वीधारी !हे देवांच्या देवा, प्रसन्न हो. तू माझे संरक्षण कर. - डॉ.पुष्करराज उदय वर्तक